SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
416 004, MAHARASHTRA
PHONE:EPABX-2609000, www.unishivaji.ac.in,
E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४, महाराष्ट्र
दूरध्वनी - ईपीएबीएक्स - २६०९०००, www.unishivaji.ac.in,
E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ - २६०९०९१, २६०९१३५

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

जा.क्र. शिवाजी वि/संलग्नता टी-२/परिपत्रक/ No 2094 दि. 06 DEC 2024

# :: अतितात्काळ ::
# :: परिपत्रक ::

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये / संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय :- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची राज्यातील अंमलबजावणीच्या अनुषंगाने गठीत करण्यात आलेल्या सुकाणू समितीच्या दि.०८-०९ ऑक्टोबर, २०२४ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने माहिती सादर करणेबाबत...

संदर्भ :- १. शासन पत्र क्रमांक युएनआय/(१३६/२२)/विशि-१/भाग-३/४८६६ दि.२५.१०.२०२४ रोजीचे पत्र.
२. या कार्यालयाचे संदर्भ क्र.शिवाजी वि/संलग्नता टी-२/परिपत्रक/२०३० दि.०६.११.२०२४ रोजीचे परिपत्रक.

महादोय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक २५.१०.२०२४ च्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे मुद्दा क्र. अ, ब, ड (गुगल फॉर्म लिंक क्र.२) इ. बाबत महाविद्यालयांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अन्वये केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दिनांक १५ नोव्हेंबर, २०२४ पर्यन्त महाराष्ट्र शासनास पाठविणे आवश्यक असलेने आपल्या महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अन्वये केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दिनांक ११ नोव्हेंबर, २०२४ पर्यन्त विद्यापीठ कार्यालयास ई-मेलव्दारे पाठविण्यात यावा असे संदर्भ क्र.२ अन्वये कळविण्यात आले होते. तथापी, आपण याबाबतचा कार्यवाही अहवाल अद्यापही विद्यापीठ कार्यालयास पाठविलेला नाही. तेव्हा सोबत जोडलेल्या शासन पत्र दि.२५.१०.२०२४ च्या पत्रामधील मुद्दा क्र. अ, ब, ड (गुगल फॉर्म लिंक क्र.२ https://forms.gle/F7iCdnGbtPMH5nGK7) हि लिंक ओपन करुन गुगल फॉर्ममध्ये आपल्या महाविद्यालयाची आवश्यक माहिती भरुन शासनास तात्काळ पाठविण्यात यावी. व त्याची एक प्रत विद्यापीठ कार्यालयास (संलग्नता टी-२ विभाग) दि.०७.१२.२०२४ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यन्त पाठविण्यात यावी अन्यथा आपल्या महाविद्यालयाचे संलग्नतेबाबतचे कोणतेही कामकाज केले जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे.

आपला विश्वासू,
Pspandv
डॉ. पी. एस. पांडव
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

सोबत :- वरीलप्रमाणे.

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय,.महाराष्ट्र राज्य,
४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर पुणे-४११ ०१६
Web : www.dhepune.gov.in E-mail:vishi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९

क्रमांक-युएनआय/(१३६/२२)/विशि-१/भाग-३ ४८६६ दि. 25 OCT

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

विषय राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची राज्यातील अंमलबजावणीच्या अनुषंगाने गठीत करण्यात आलेल्या सुकाणू समितीच्या दि.०८-०९ ऑक्टोबर, २०२४ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने माहिती सादर करणेबाबत.

संदर्भ १.शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक एनईपी-२०२२/प्र.क्र.०९/विशि-३ शिकाना दि.३० ऑगस्ट, २०२४
२.शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक एनईपी-२०२२/प्र.क्र.०९/विशि-३ शिकाना दि.१३ सप्टेंबर, २०२४

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन निर्णयान्वये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची राज्यातील अंमलबजावणीच्या अनुषंगाने गठीत उपसमितीच्या अहवालातील शिफारसीच्या अंमलबजावणीसंदर्भात आढावा घेऊन येणाऱ्या अडचणी निवारणासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी व मार्गदर्शन करणेसाठी संदर्भिय शासन निर्णयान्वये सुकाणू समिती पुनर्गठीत करण्यात आलेली आहे.

या समितीची बैठक दि ८-०९ ऑक्टोबर, २०२४ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिलेल्या निर्देशानुसार विद्यापीठांनी खालील प्रकारची माहिती विहित नमुन्यात MS-office Excel आणि PDF स्वरूपात vishi.dhepune@nic.in या ईमेलवर तात्काळ सादर करण्यात यावी.

**अ) ज्या महाविद्यालयांचे स्वत:चे संकेतस्थळ नाही अशा महाविद्यालयांची यादी**

| विद्यापीठाचे नाव | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | जिल्हा | प्रकार(स्वायत्त/संलग्नित) | व्यावसायिक/पारंपारिक |
| | | | | |

**ब) शासन निर्णय दि.२० एप्रिल,२०२३, १६ मे,२०२३,०४ जुलै,.२०२३ आणि शासन पत्र दि.१३ मार्च,२०२४ नुसार राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणी झालेल्या व्यावसायिक व पारंपारिक महाविद्यालयांची संख्या**

| विद्यापीठाचे नाव | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | एकूण स्वायत्त महाविद्यालयांची संख्या | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी केलेल्या स्वायत्त महाविद्यालयांची संख्या | एकूण संलग्नित महाविद्यालयांची संख्या | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी केलेल्या संलग्नित महाविद्यालयांची संख्या |
| | | | | |

**क) बीएसडब्ल्यू/एमएसडब्ल्यू/बीबीए/बीएमएस/बीसीए/एमबीए/एमसीए /हॉटेल मॅनेजमेंट/हॉस्पीटॅलिटी मॅनेजमेंट, जर्नालिझम इ.अभ्यासक्रमांना शासन निर्णय दि.२० एप्रिल,२०२३, १६ मे,२०२३,०४ जुलै,.२०२३ आणि शासन पत्र दि.१३ मार्च,२०२४ नुसार राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणी केली आहे /नाही बाबतची माहिती**

| अ.क्र. | अभ्यासक्रम | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी केली आहे किंवा नाही | लागू केल्याचे वर्ष |
|---|---|---|---|
| १. | बीएसडब्ल्यू | | |
| २ | एमएसडब्ल्यू | | |
| ३ | बीबीए | | |
| ४ | बीएमएस | | |
| ५ | बीसीए | | |
| ६ | एमबीए | | |
| ७ | एमसीए | | |
| ८ | हॉटेल मॅनेजमेंट | | |
| ९ | हॉस्पीटॅलिटी मॅनेजमेंट, | | |
| १० | जर्नालिझम | | |

सदरील अभ्यासक्रमांचा संपूर्ण तपशील (Syllabus) समिती सदस्य प्रा.डॉ.कविता लघाटे यांचेकडे त्यांचा ई-मेल kavitalaghate@jbims.mu.ac.in व kavitalaghate@jbims.edu या ईमेलवर तात्काळ पाठविण्यात यावे.

**ड) OJT/Internship/Field Project संदर्भात माहिती सादर करणेबाबत**

OJT/Internship/Field Project संदर्भात महाविद्यालये व विद्यापीठाकडून माहिती मागविण्याकरिता खालीलप्रमाणे दोन google form तयार करण्यात आले असून त्यांची लिंक स्वतंत्रपणे खाली दिली आहे. लिंक क्र.१ ही फक्त विद्यापीठांकरिता असून लिंक क्र.२ ही विद्यापीठे व महाविद्यालयांमधील पदव्युतर अभ्यासक्रमांकरिता आहे.

सदरची माहिती विद्यापीठांनी ज्या महाविद्यालयामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम राबविला जातो अशा महाविद्यालयांना पाठवून माहितीचे संकलन दि.१५ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत संचालनालयास google form व्दारे उपलब्ध होईल याची दक्षता विद्यापीठांनी घ्यावी.

तसेच सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी सदर गुगल फॉर्म लिंक क्रमांक २ ही आपल्या विभागातील ज्या महाविद्यालयामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम राबविला जातो अशा महाविद्यालयांना पाठवावी व सर्व पदव्युत्तर महाविद्यालये सदरची माहिती google लिंक वर तात्काळ भरतील याबाबतची दक्षता घ्यावी.

गुगल लिंक खालीलप्रमाणे

| अ.क्र. | गुगल लिंक | | |
|---|---|---|---|
| | https://forms.gle/wB5YywKiLfVK2y1F6 गुगल फॉर्म लिंक क्र.१ | राज्यातील अकृषी विद्यापीठामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत सुरू करण्यात आलेल्या आंतरवासिता /फिल्ड प्रोजेक्ट/ओजेटी संदर्भातील अभ्यासक्रमाची माहिती | खुद्द विद्यापीठांकरिता |
| | https://forms.gle/F7iCdnGbtPMH5nGK7 गुगल फॉर्म लिंक क्र.२ | राज्यातील अकृषी विद्यापीठे व महाविद्यालयामधील पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत सुरू करण्यात आलेल्या आंतरवासिता /फिल्ड प्रोजेक्ट/ओजेटी संदर्भातील अभ्यासक्रमाची माहिती | अकृषी विद्यापीठे व महाविद्यालयामधील पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता |

**इ) IKS अभ्यासक्रमासंदर्भात माहिती**

सर्व अकृषी विद्यापीठांनी जेनेरिक IKS संदर्भातील सर्व अभ्यासक्रमांची माहिती (Syllabus) समिती सदस्य तसेच IKS उपकार्यबल गटाच्या सदस्य प्रा.डॉ.सुप्रिया पाटील यांच्या spatilpumba@gmail.com या ईमेल पत्यावर तात्काळ पाठवावी.

**ई) नॉन बीए/बीकॉम/बी.एस्सी अभ्यासक्रमांबाबतची माहिती**

Non BA/B.Com/B.Sc अभ्यासक्रमांबाबत अकृषी विद्यापीठांनी तयार केलेला श्रेयांक आराखड्याची माहिती सर्व विद्यापीठांनी उपकार्यबल गटाचे प्रमुख डॉ.युगांक गोयल यांच्या yugank.goyal@flame.edu.in या ईमेल पत्यावर लवकरात लवकर पाठवावी.

**उ) सुकाणू समितीमधील सदस्यांची विद्यापीठनिहाय मार्गदर्शक /समन्वयक म्हणून नियुक्ती**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राज्यातील सर्व संलग्नित महाविद्यालयांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंमलबजावणी सुरू झाल्याने सर्व अकृषी विद्यापीठांना सुकाणू समितीच्या माध्यमातून मार्गदर्शक म्हणून सुकाणू समितीतील सदस्य विद्यापीठनिहाय खालीलप्रमाणे मार्गदर्शक/समन्वयक म्हणून नामनिर्देशन करण्यात आले आहे.

| अ.क्र. | विद्यापीठाचे नाव | मार्गदर्शक/समन्वयक |
|---|---|---|
| १ | मुंबई विद्यापीठ, मुंबई | श्री.महेश दाबक,युगांक गोयल |
| २ | श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई | डॉ.डी.टी.शिर्के,डॉ.अश्विनीकुमार शर्मा |
| ३ | डॉ.होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबई | |
| ३ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | डॉ.माधव वेलिंग, डॉ.विलास सपकाळ, डॉ.प्रशांत मगर |
| ४ | कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | डॉ.आर.डी.कुलकर्णी, डॉ.वाल्मिक सरवदे |
| ५ | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | डॉ.नितीन करमळकर, डॉ.व्ही.बी.गायकवाड |
| ६ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | डॉ.विलास सपकाळ, डॉ.क्रांतीकुमार पाटील |
| ७ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर | डॉ.व्ही.एल.माहेश्वरी, डॉ.एफ.सी.रघुवंशी |
| ८ | स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड | डॉ.मुरलीधर चांदेकर, डॉ.वाल्मिक सरवदे |
| ९ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | डॉ.जोगेंद्रसिंग बिसेन, डॉ.कविता लघाटे, श्री.महेश दाबक |
| १० | संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती | डॉ.अजय भामरे, श्री.अनिल राव |
| ११ | गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली | डॉ.उज्वला चक्रदेव, डॉ.सुप्रिया पाटील |
| १२ | कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक नागपूर | |
| १३ | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | डॉ.व्ही.एल.माहेश्वरी, श्री.अनिल राव |
| १४ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे रायगड | डॉ.आर.डी.कुलकर्णी, श्री.भरत अमळकर |

उक्त मार्गदर्शकांनी पुढील १ ते २ महिन्यात संबंधित विद्यापीठास भेट देणे, तेथील राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा आढावा घेणे, समस्या, अडचणी इ.चे निराकरण करणे, विद्यापीठांच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासंदर्भातील Best Practices अभ्यासणे इ.जबाबदारी पार पाडतील. विद्यापीठांनी या भेटीदरम्यान आपल्या विद्यापीठाचे प्र-कुलगुरू यांना याकरिता नोडल अधिकारी म्हणून नियुक्त करावे. विद्यापीठांनी आपल्या विद्यापीठाच्या संबंधित मार्गदर्शकांशी संपर्क करावा.

**वर उल्लेखित अ ते उ संदर्भात आवश्यक ती कार्यवाही तात्काळ विद्यापीठांनी करावी.**

(डॉ.शैलेंद्र देवळाणकर)
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६.

**प्रत- माहितीस्तव सादर**

मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२

**प्रत-माहिती व कार्यवाहीसाठी**

प्रत- सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य

२/- त्यांना कळविण्यात येते की, उक्त विषयाबाबतची कार्यवाही सर्व विद्यापीठस्तरांवरून करण्याबाबत आपल्या स्तरावरून विद्यापीठाशी संपर्क करावा.

# शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे

१६

आंतरवासिता / Field Project अंमलबजावणीसंदर्भातील माहिती

( महाविद्यालय/ विद्यापीठातील पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी ) गुगल फॉर्म क्र. २

**affiliation.t2@unishivaji.ac.in** Switch account

The name, email, and photo associated with your Google account will be recorded when you upload files and submit this form

Any files that are uploaded will be shared outside of the organization they belong to.

* Indicates required question

Email *

☐ Record **affiliation.t2@unishivaji.ac.in** as the email to be included with my response

१) महाविद्यालयाचे नाव व पत्ता *

Your answer

इमेल *

Your answer

संपर्क क्रमांक (मोबाईल क्र.) *

Your answer

२) महाविद्यालयाचा प्रकार – *

- अ) अनुदानित/ विनाअनुदानित
- ब) स्वायत्त आहे / नाही.

३) महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन झाले आहे / नाही. *

- Yes
- No

४) विद्यापीठाचे नाव -

- Option 1

५) आंतरवासिता कक्ष स्थापन केला आहे का ? होय / नाही. *

- Yes
- No

६) कक्ष स्थापन केला असेल तर कक्षप्रमुखाचे नाव *

Your answer

संपर्क क्रमांक - *

Your answer

७) आंतरवासिता संदर्भात महाराष्ट्र शासनाने २९ फेब्रुवारी २०२४ रोजी निर्गमित केलेल्या शासन आदेशानुसार रचना व अहवाल तयार केलेला आहे का ? होय / नाही. *

- Yes
- No

८) आंतरवासिता /Field Project बाबत आपल्या विद्यापीठाने आपल्यास काही सूचना केल्या आहेत / नाहीत. *

- Yes
- No
- Option 3

९) आंतरवासिता केलेल्या विद्यार्थ्यांची विषयनिहाय माहिती (खालील मुद्द्यांना अनुसरून माहिती सदर करावी ). *

- पदव्युत्तर वर्गाचा विषय

- अनुदानित / विनाअनुदानित

- आंतरवासिता उपलब्ध करून दिलेल्या संस्थेचे नाव

- आंतरवासिता उपलब्ध करून दिलेल्या संस्थेशी सामंजस्य (MOU )करार झाला आहे किंवा नाही.

- आंतरवासिता पूर्ण करण्याची पध्दती Online/ Offline

- आंतरवासिता करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या

Upload 1 supported file: PDF or spreadsheet. Max 10 MB.

Add file

१०. Field Project घेतलेल्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांची विषयनिहाय माहिती (खालील मुद्द्यांना अनुसरून माहिती सदर करावी ). *

- पी.जी. विषय

- अनुदानित/विनाअनुदानित

- Field Project करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या

Upload 1 supported file: PDF or spreadsheet. Max 10 MB.

Add file

११)आंतरवासिता / Field Project संदर्भात सेवायोजकांची माहिती महाविद्यालय संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली आहे का ? होय/ नाही. *

- Yes
- No

१२)आंतरवासिता / Field Project मूल्यांकनाची पद्धती. (दोन्ही बाबतची मूल्यांकन पध्दती स्वतंत्र नमूद करावी ) *

Your answer

१३)आंतरवासिता उपलब्ध करून देण्यासाठी महाविद्यालयाने केलेल्या विशेष प्रयत्नांची माहिती. *

Your answer

१४)आंतरवासिता उपलब्ध करून दिलेल्या संस्थेचा या उपक्रमाबाबत अभिप्राय घेतला असल्यास तो अभिप्राय नमूद करावा. *

Your answer

१५)आंतरवासिता / Field Project संदर्भात विद्यार्थ्यांचा अभिप्राय. *

Your answer

१६)आंतरवासिता / Field Project अंमलबजावणी करतांना आलेल्या अडचणी. *

Your answer

१७)आंतरवासिता / Field Project उपक्रमाची अंमलबजावणी यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयांच्या विधायक सूचना. *

Your answer

Submit

Clear form

Never submit passwords through Google Forms.

This form was created outside of your domain. - Terms of Service - Privacy Policy

Does this form look suspicious? Report

Google Forms